जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्या एक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेच्या पीएच.डी. पदवीसाठी सादर

संशोधक

श्री. ढोके नंदकुमार गणपतराव

बी.एड, एम.(इति.) एम.ए. (शिक्षणशास्त्र)

मार्गदर्शक

डॉ. साखरे एस.एम.

एम.ए.(Eng.), एम.ए.(लोकप्रशासन), एम.एड . सेट शिक्षणशास्त्र

पीएच.डी. (शिक्षणशास्त्र) सहयोगी प्राध्यापक

संशोधन केंद्र

शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

वर्ष

2017

अनुक्रमाणिका

अ.क्र.	तपशिल	पान क्रमांक
1	प्रस्तावना	1 ते 4
2	संशोधनाची गरज	5 ते 6
3	संशोधनाचे महत्व	7 ते 8
4	संशोधन समस्या शिर्षक व कार्यात्मक व्याख्या	9
5	संशोधनाची उद्दीष्टेय	10
6	गृहितके	11
7	परिकल्पना	12
8	संशोधनाची व्याप्ती	13
9	संशोधनाच्या मर्यादा	14
10	नमुना निवड व संबंधित संशोधनाचा आढावा, संशोधनाचे वेगळेपण	15
	संदर्भसुची	

1. **प्रस्तावना** :-

'भारताचा भाग्योदय हा वर्गखोल्यांतून होत आहे.' (Destiny of india is being shaped in its classroom) असे भाकीत डॉ. कोठारी यांनी आपल्या भारतीय शिक्षण आयोगात (1964-66) वर्तवले होते आणि 1968 चा अभ्यासक्रम कोठारी आयोगाच्या शिफारशीवरुन तयार केला. 1986 ला नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण अंगीकृत करुन भारतीय शिक्षण पध्दतीमध्ये पुनर्मुल्यांकन करण्यात आले. शिक्षणाची कार्यक्षमता व दर्जा सुधारण्याचा प्रयत्न झाला. 1968 च्या शैक्षणिक धोरणावर 1988 चा अभ्यासक्रम आधारित आहे. 1995 चा क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम डॉ. दवे समितीच्या शिफारशीवर आधारित आहे. त्यानंतर पुनर्रचित अभ्यासक्रम, 1995 ला कौशलधिष्ठित अभ्यासक्रम, राष्ट्रीय शैक्षणिक आराखडा 2000, प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम 2004, सर्वशिक्षा अभियान, 2009 (RTE) शिक्षण कायदा अस्तीत्वात आला. याचा अर्थ काय ? सॉक्रटीस म्हणतात, 'जितक्या शाळा चांगल्या तितके राष्ट्र चांगले जितके शिक्षक चांगले,' तितक्या शाळा चांगल्या त्यामुळे शाळा समृध्द व्हाव्यात म्हणून शैक्षणिक गुणवत्ता विद्यार्थ्यांमध्ये दिसायची असेल तर शाळा आणि शिक्षक समृध्द असले पाहिजे. म्हणून भारत सरकारने राज्यसरकार व युनिसेफच्या मदतीने प्रेरणादायी शाळा विकासाचे निकष या स्वयंमुल्यमापन साधनाव्दारे शाळेची श्रेणी निश्चित करुन शाळेच्या प्रगतीसाठी शैक्षणिक वातावरण निर्मितीचा प्रयत्न केला. शाळा म्हणजे फक्त इमारत, शिक्षक किंवा मुलांनी फक्त एकत्र येण्याची जागा नसून शिक्षणासाठी, विकासासाठी ती एक वैशिष्ट्यपूर्ण खास जागा आहे. मुलांना ज्ञानाला आकार आणि स्वरुप देणे, कुतुहल

जागे करणे, सक्रीय बनविणे. प्रश्न निर्माण करुन उत्तरे शोधायला व समस्या जाणून घ्यायला उद्युक्त करते, भविष्य घडवते, शिकवणे म्हणजे नित्यकर्म नाही. तो एक नित्य आनंददायी अनुभव आहे. परंतु हाच अनुभव जिल्हा परिषद शाळामधून विद्यार्थ्यांना देण्यात जिल्हापरिषद शाळा कमी पडत आहेत. जिल्हापरिषद शाळामध्ये शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्या आजही बदलत्या शैक्षणिक परिस्थितीमध्ये कायमच आहेत. कारण केंद्र व राज्यशासन यांनी नेमलेले शिक्षण सुधारणाआयोग, वेळोवेळी नेमलेल्या शिक्षण समित्या त्यांनी सुचविलेल्या शिफारशी यांचा विचार केला तर आज जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण आवश्यक होते ते नाही. उलटपक्षी जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये समस्या निर्माण होत आहेत. कागदोपत्री मात्र शाळा समृध्द दाखविल्या जातात. प्रत्यक्ष पाहिले तर पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधा यामध्ये 70% शाळांची परिस्थिती खेडोपाडी हालाखीची आहे. शाळा इमारण नादुरुस्त मोडकळीस आलेल्या, विशेष गरजा असणाऱ्या मुलांसाठीच्या सुविधा काही कालावधीतच मोडकळीस आल्या. स्वच्छतागृहे नावालाच प्रत्यक्षात उपयोग मात्र काही करता येत नाही. किचनशेड दारे, खिडक्या, पत्रे मोडकळीस आलेली, फर्निचरची दुरावस्था, शुध्द पिण्याच्या पाणीची सुविधा नाही विद्युत सुविधेसाठी शासनाने ठोस उपाय केलेले नाहीत. संरक्षण भिंतीचा अभाव, कचरा व सांडपाण्याचे व्यवस्थापन योग्य प्रकारे केलेले नाही. विद्यार्थ्यांना रमण्यासाठी शालेय बाग नाहीत. NTB ची पुस्तके आलीत तीही अपुरी ग्रंथालय म्हणायला आहे, परंतु विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्षात वाचन होत नाही, प्रयोगशाळा नाहीत, आहेत तेथे स्थिती दयनिय आहे. शाळा सजावट नाहीत त्यासाठी पुरेसा निधी शासनाकडून उपलब्ध केला जात नाही. शैक्षणिक

साहित्य, शैक्षणिक तंत्रज्ञात अपुऱ्या सुविधा. कला कार्यानुभव व खेळ साहित्य यांच्याकडे दुर्लक्ष असल्याने त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होत नाही. पुरेसे खेळाची मैदानी नाहीत. शालेय अभिलेखे व इतर ऑनलाईन कामात मुख्याध्यापक सतत वेजार असल्याने पुरेसा वेळ शाळेला मिळत नाही. शासनाने जरी शैक्षणिक प्रगतीसाठी शैक्षणिक उठाव घडवून लोकसहभागाचा फायदा शाळेला करण्याचे ठरविले तरी जिल्हा परिषद शाळांमध्ये शिक्षण घेणारी मुले गरीब कुटुंबातील असल्याने फारसा प्रतिसाद मिळतच नाही. मध्यमवर्गीय, नौकरदार, श्रीमंत यांची मुले खाजगी, इंग्रजी शिक्षण संस्थामध्ये घेतात. व्यवस्थापन समितीच्या रुपाने शाळांमध्ये राजकारण आल्याने शिक्षक पालकसंघ, माता पालकसंघ यांचं महत्व शाळांमध्ये नियमित बैठकांच्या माध्यमातून दिसून येत नाही. शैक्षणिक संधीची समानता म्हटले तर शाहाबाह्य मुलांचा प्रश्न आहे. स्थलांतरीत बालके आहेत. शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनामध्ये अडथळे आहेत. विद्यार्थी उपस्थिती पाहिजे तशी नाही. प्रत्येक वर्गात 2 ते 4 विद्यार्थी नेहमी अनुपस्थित असतात. अध्ययन अध्यापन प्रक्रिया परिणामकारण नाहीत, वर्गानुसार अपेक्षीत मुलभूत कौशल्याबाबत विद्यार्थ्यांची प्रगती पाहिजे तशी नाही. शिक्षक-विद्यार्थी, विद्यार्थी-विद्यार्थी आंतरक्रिया यांचे संबंध औपचिरकच आहेत. अभ्यासक्रमातून मुल्यशिक्षण व विद्यार्थ्यांच्या संख्यात्मक विकासच शाळामध्ये जास्त भर दिला जातो. विशेष प्राविण्यसाठी विविध स्पर्धा सहभाग याकडे दुर्लक्ष होत आहे. सातत्यपूर्ण सर्वकष मुल्यमापनातील त्रुटी व विद्यार्थ्यांची शैक्षणिक संपादणूक कमी आहे. या सर्व परिस्थितीचा विचार केला तर असे दिसून येते की, जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणि वातावरण निर्मिती 21 व्या शतकामध्ये सुध्दा चिंताजनक आहे. परंतु याची जबाबदारी

शिक्षक, विद्यार्थी, पालक, प्रशासन यापैकी कोणा एकाची नसून त्याचा सर्वच घटक जबाबदार आहेत असे म्हटले तर दुमत होणार नाही. म्हणून यातील प्रत्येक घटकांनी स्वत:ला जिम्मेदार समजून एकमेकांवर दोष न देता कार्य करणे महत्वाचे आहे. कारण याचा परिणाम पालकांची जिल्हा परिषद शाळांविषयीची मानसिकता बदलत असून दिवसेंदिवस विद्यार्थ्यीसंख्या रोडावत आहे व शासनाच्या शिक्षणाचे सार्वत्रीकरण हे प्राथमिक शिक्षणाच्या गुणवत्तेसह सार्वत्रिकरण हे कुचकामी ठरु पाहत आहे. त्यासाठी जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मिती हीच विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकास घडून येण्यास आवश्यक आहे. म्हणून संशोधकाने जिल्हा परिषद शाळांमधील मुलभूत समस्या लक्षात घेवून संशोधनासाठी प्रस्तुत विषय निवडला आहे.

2. **संशोधनाची गरज** :

प्रस्तुत संशोधनाचा उपयोग केवळ संशोधकालाच होतो असे नाही, तर शिक्षण क्षेत्राला, विद्यार्थी शिक्षक, पालक व शासनाच्या विभागालाही होतो. संयुक्त राष्ट्राने 20 नोव्हेबर 1989 रोजी बालहक्क संहितेला मान्यता दिली. या संहितेला भारतासह 193 राष्ट्रांनी मान्यता दिली. या संहितेच्या 43 कलमान्वये मुलांच्या सर्वस्पर्शी हक्कांना या मसुद्याने मान्यता दिली. RTE 2009 नुसार कलम 29 शिक्षणाची चर्चा केली आहे. मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळण्याचा हक्क आहे आणि त्यानुसारच जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचा सर्वांगिण विकास होण्यासाठी आवश्यक असणारे शैक्षणिक वातावरण मिळणे महत्वाचे आहे. कारण शाळांमध्ये असणारे शैक्षणिक वातावरण हे विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता विकासावर परिणाम करत असते. जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मिती ही अनुकू असेल तर त्याचा परिणाम विद्यार्थ्यांसाठी दर्जेदार शिक्षण मिळण्यास मदत करणारा असेल. परंतु आज जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये अनेक समस्या आहेत. त्यामध्ये पायाभूत भौतिक व शैक्षणिक सुविधांची कमतरता तसेच लोकसहभाग व पालकांची उदासीनता, शैक्षणिक संधीच्या समानतेमध्ये विशेष गरजा असणाऱ्या मुलांच्या सुविधा असतील, अनुसुचित जाती, जमातीच्या मुलांचे गणवेश शिष्यवृत्ती, अल्पसंख्यांक, मुलांची शिष्यवृत्ती यामध्ये विष्कळीतपणा आहे. केव्हाही प्राप्त होते त्यामुळे शालेय वर्गात विद्यार्थ्यांना त्या त्या वर्षी त्यांचा लाभ घेता येत नाही. शाळाबाह्य मुले व स्थलांतरीत मुले शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये समस्या निर्माण करतात. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता संवर्धनामधील अडथळे, त्यामुळे

जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये समस्या निर्माण होतात. या समस्यामध्ये ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळत नाही व त्यांना त्या शाळांमध्ये असणारे वातावरण शैक्षणिक विकास करण्यास पोषक नसल्याने ते जिल्हा परिषद शाळा सोडून खाजगी शिक्षण देणाऱ्या महागड्या शाळेत गुणवत्ता विकास व्हावा म्हणून आर्थिक पिळवणूकीला बळी पडतात. परिणामी शासनाची शिक्षणाचे गुणवत्तापूर्ण प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण हे उद्दिष्ट साध्य होत नसून ग्रामीण भागात जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण निर्मिती ही ग्रामीण भागातील मुलांच्या गुणवत्ता विकासात अडसर निर्माण करते. म्हणून मुळात जि.प. शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीतील समस्या कोणत्या आहेत हे शोधणे गरजेचे आहे. म्हणून हा संशोधन विषय गरजेचा आहे.

3. **संशोधनाचे महत्व** :

आजघडीला राज्यात खऱ्या अर्थाने प्राथमिक शिक्षणात एक प्रकारची शैक्षणिक चळवळ सुरु झाली आहे. गावोगावी शिक्षक व पालक यांच्या सहकार्यातून शाळाशाळांत भौतिक सोयी सुविधांसोबतच गुणात्मक वातावरण निर्मितीसाठी लोकसहभातून शिक्षण सक्षमीकरणाचा नवा पायंडा महाराष्ट्रात रुजतो आहे. हे जरी ऐकायला, बघायला आनंदाचे वाटत असले तरी अशा लोकसहभागातून शाळांचा पायाभूत भौतिक सुविधा व शैक्षणिक सुविधा मिळविण्याचा उपक्रम मराठवाडा विभागात किती आहे याचा विचार महत्वाचा आहे. जिल्ह्यात 10 ते 20 शाळा लोकसहभागातून शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण निर्मिती करण्यास फार तर यशस्वी होतात. म्हणून काय सर्वच जिल्हा परिषद शाळा या उपक्रमाचा भाग होतील व सर्वांनाच त्यामधून जिल्हा परिषद शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण निर्मिती करणे सहज सोपे जाईल अशी अपेक्षा बाळणे कितपत संयुक्तिक आहे. ज्ञानरचनावादी शाळा, डिजीटल शाळा, एबीएल शाळा ही शिक्षणाची बेटे शासनाला विकसीत करायची पण त्यामध्ये लोकसहभागावरच आर्थिक बोजा टाकणे हा शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये असणारा मोठा अडथळा आहे. एकतर जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणारी सर्व मुले ग्रामीण भागातली व त्यातल्या त्यात वंचित दुर्बल घटक व गरीब कुटुंबातील आहेत. करण मध्यमवर्ग व श्रीमंत कुटुंब यांची मुले खाजगी, इंग्रजी माध्यमांच्या शाळेत दाखल असतात. मग ज्या कुटुंबात स्वत:चा उदरनिर्वाहाचा प्रश्न आहे. त्यांच्या जीवावर आज जिल्हा परिषद शाळांमधून शैक्षणिक वातावरण निर्मिती करणे, ज्ञानरचना वादाची स्पप्न पाहत, डिजीटल शाळा, एबीएल शाळा करणं हा खूप मोठा अडथळा

आहे. म्हणून आज जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये पायाभूत भौतिक सुविधा शैक्षणिक सुविधा, लोकसहभागातील अडथळे, शैक्षणिक संधीच्या समानतेबाबत असलेला विष्कळीतपणा, शैक्षणिक गुणवत्ता संवर्धनातील अडथळे यांचा सविस्तर विचार केलयास जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मिती करणे यामध्ये अनेक समस्या आहेत आणि ते दूर करणे आवश्यक आहे. जिल्हा परिषद शाळांकडे पाहण्याचा पालकांचा दृष्टीकोन नकारात्मक होत आहे. त्यामुळे खाजगी संस्थांची शैक्षणिक क्षेत्रात मक्तेदारी वाढत आहे. परिणामी ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमधील नेमक्या कोणकोणत्या समस्या आहेत हे समजून घेण्यास हे संशोधन संशोधकाच्य दृष्टीने अधिक महत्वाचे आहे.

4. **संशोधन समस्या शिर्षक** :

“जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्या एक अभ्यास.”

5. **कार्यात्मक व्याख्या** :

प्रस्तुत संशोधनाच्या शीर्षकातील पारिभाषीक शब्दाच्या व्याख्या.

1.	मराठवाडा	:	महाराष्ट्रातील एक महसुली विभाग ज्यामध्ये एकूण 8 जिल्ह्यांचा समावेश आहे.
2.	जिल्हा परिषद	:	जिल्हा परिषद म्हणजे महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 अन्वये स्थापन केलेली किंवा रचना केलेली जिल्हा परिषद (1962 चा 5)
3.	शाळा परिषद शाळा	:	महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 अन्वये स्थापन केलेल्या जिल्हा परिषद या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत चालविली जाणारी प्राथमिक शाळा ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांना शिक्षण दिल्या जाते.
4.	शैक्षणिक वातावरण	:	ज्या वातावरणात मुलांना आकार आणि ज्ञानाला स्वरुप देणे, त्यांच्यात कुतुहल जागे करुन सक्रिय बनविणे, प्रश्न निर्माण करुन उत्तरे शोधायला व समस्या जाणून घ्यायला उद्युक्त करणे, शिकवून त्यांचे भविष्य घडविणे ही प्रक्रिया घडते, त्याला शैक्षणिक वातावरण म्हणतात.

6. **संशोधनाची उद्दिष्टे** :

1. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

2. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मिती समस्यांचा कारणांचा शोध घेणे.

3. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमधील समस्यांचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होणाऱ्या परिणामांचा शोध घेणे.

4. जिल्हा परिषद प्राथमिक शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

7. **गृहितके** :

1. मराठवाडा विभागातील मुले-मुली जिल्हा परिषदेच्या शाळांमधून शिक्षण घेतात.

2. जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमधील मुले-मुली शैक्षणिक वातावरण निर्मिती नसल्याने शाळेमध्ये रममान होत नाहीत.

3. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरणाविषयी पालकांचा पाहण्याचा दृष्टीकोण संकुचित आहे.

4. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीत अनेक समस्या आहेत.

5. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये समस्याचा परिणाम होतो.

6. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीत येणाऱ्या समस्यांकडे फारसे लक्ष दिल्या जात नाही.

8. **परिकल्पना** :

1. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण निर्मिती करता येते.

2. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्या दूर झाल्यास, गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्मिती होईल.

3. जिल्हा परिषदेच्या बहुतांश प्राथमिक शाळांत शैक्षणिक वातावरण निर्मिती होईल.

4. शिक्षक, विद्यार्थी, पालक प्रशासन सर्वांनी स्वत:ची जबाबदारी जिम्मेदारी पूर्ण सांभाळल्यास जिल्हा परिषद शाळांत शैक्षणिक वातावरण निर्मिती वाढेल.

5. जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीतील समस्याचा अभ्यास केल्यास जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गणुवत्तापूर्ण शैक्षणिक वातावरण निर्मितीसाठी उपाय करता येतील.

9. **संशोधनाची व्याप्ती** :

1. प्रस्तुत संशोधन हे मराठवाड्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांशी संबंधित आहे.

2. प्रस्तुत संशोधन जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणारे समस्यांशी संबंधित आहे.

3. प्रस्तुत संशोधन जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्याचा अभ्यास करण्याशी संबंधित आहे.

4. प्रस्तुत संशोधनात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमध्ये येणाऱ्या समस्यांचा विचार करण्यात आला आहे.

5. प्रस्तुत संशोधन जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांमध्ये शैक्षणिक वातावरण निर्मिती मधील समस्या जाणुन घेण्याशी संबंधित आहे.

10. **संशोधनाच्या मर्यादा** :

1. प्रस्तुत संशोधन मराठवाडा विभागापुरतेच संबंधित आहे.

2. प्रस्तुत संशोधन हे मराठवाडा विभागातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळांपुरतेच मर्यादित आहे.

3. प्रस्तुत संशोधनात जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मितीमधील येणाऱ्या समस्या एक अभ्यासा पूरतेच मर्यादित आहे.

4. प्रस्तुत संशोधन जिल्हा परिषद प्राथमिक शाळांमधील शैक्षणिक वातावरण निर्मिती गरजेपुरताच मर्यादित आहे.

11. **संशोधन कार्यपध्दती** :

प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सर्वेक्षण पध्दतीचा अवलंब केला आहे.
संशोधकाने संशोधन समस्येशी निगडीत सर्व बाबींची माहिती घेवून शिक्षक, विद्यार्थी, पालक, समाज, प्रशासन यांच्या अडचणींचा अभ्यास केला आहे. सर्वेक्षण ही संशोधनाची सर्वात प्रभावी पध्दत आहे.

12. **नमुना निवड** :

सदरील संशोधनासाठी नमुना निवड करतांना संशोधकाने मराठवाडा विभागातील 5 जिल्ह्यांची लॉटरी पध्दतीने निवड केली.

13. **संबंधित संशोधनाचा आढावा** :

Lata Parvesh (पीएच.डी.साठी) - 2016.

Development of IT enabled instructional package in science and its impact on academic achievement of school student.

Rashmi Oza (पीएच.डी.साठी)

Package scheme of incentives and impact on regional industrial evelopment in Maharashtra.

14. **संशोधनाचे वेगळेपण** :

शैक्षणिक वातावरण निर्मितीविषयी, औद्योगिक वातावरण निर्मितीविषयी संशोधनेही झालेली आहेत. मात्र ही संशोधने एकत्रित नसून वेगळी आहेत. ती औद्योगिक क्षेत्र, आयटी क्षेत्र, शैक्षणिक समस्या या क्षेत्राशी संबंधित आहेत. मात्र ती जिल्हा परिषद प्राथमिक शाळांतील शैक्षणिक वातावरण निर्मितीविषयी झालेली नाहीत ही या संशोधनाचे वेगळेपण सांगता येईल.

15. **संदर्भ सूची** :

1. बापट मा.गो. (1995) - शैक्षणिक संशोधन, नुतन प्रकाशन, पुणे.
2. मुळे उमाठे (1998) - शैक्षणिक संशोधनाच मुलतत्वे, विद्या प्रकाशन, औरंगाबाद.
3. भिंताडे वि.रा. (1995) - शैक्षणिक संशोधन पध्दती, नूतन प्रकाशन, पुणे.
4. एम.बी. बुथ - Fifty Survey of Edu. Research ecological and Environmental studies in Education -1962-92- R.S. Attribush.
5. नवनियुक्त प्रशिक्षीत शिक्षकांचे प्रशिक्षण शिक्षक हस्तपुस्तिका - म.रा.शै.सं. व प्र. परिषद (विद्या परिषद) पुणे- 30.
6. पाटील लीला (1995) परिवर्तनशिल शिक्षण - उन्मेष प्रकाशन, पुणे.
7. नवखणे मीनल (1999) - भारतातील शैक्षणिक आयोग व समित्या - नुतन प्रकाशन, पुणे.

मार्गदर्शक

डॉ. साखरे एस.एम.
सहयोगी प्राध्यापक
शासकीय अध्यापक महाविद्यालय, नांदेड

संशोधक

श्री. ढोके नंदकुमार गणपतराव